गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

● वर्ष १ ले ● अंक २८८ वा ● शनिवार ०९ मार्च २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 1 | Issue 288 | Date : 09/03/2024 blow Saturday Page 4 Price 4

## शासनाच्या लोकोपयोगी धोरणांमुळे सर्वसामान्यांच्या जीवनात बदल : मुख्यमंत्री

सांगली : 'शासन आपल्या दारी' हा उपक्रम लोकाभिमुख असून सर्वसामान्य माणसांच्या जीवनात बदल घडविणे, हे या योजनेचे उद्दिष्ट आहे. हे सरकार गोरगरिबांचे, कष्टकऱ्यांचे, शेतकऱ्यांचे असून त्यांना न्याय देण्यासाठी 'शासन आपल्या दारी' च्या माध्यमातून थेट योजनाच लाभार्थ्यांपर्यंत आणण्यासाठी हा कार्यक्रम मोठ्या प्रमाणात राज्यभर घेतला. राज्यात सुमारे साडेचार कोटी लाभार्थ्यांना शासनाच्या वतीने विविध लाभ देण्यात आले. म्हणूनच हे शासन सर्वसामान्यांच्या जीवनात बदल घडविणारे सर्वसामान्यांचे शासन आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.

'शासन आपल्या दारी' या उपक्रमाचे आयोजन इस्लामपूर हायस्कूल मैदानावर करण्यात आले होते. यावेळी पालकमंत्री डॉ. सुरेश खाडे, राज्य उत्पादन




शुल्क मंत्री शंभूराज देसाई, विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, खासदार धैर्यशील माने, आमदार सुधीर गाडगीळ, माजी मंत्री अण्णा डांगे, माजी राज्यमंत्री सदाभाऊ खोत, जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी, पोलीस अधीक्षक संदीप घुगे, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तृप्ती धोडमिसे, महानगरपालिका आयुक्त सुनिल पवार, अपर जिल्हाधिकारी डॉ. स्वाती देशमुख यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, शासन आपल्या दारी उपक्रमांतर्गत जास्तीत जास्त गरजू लाभार्थ्यांना लाभ देण्यासाठी जिल्हा प्रशासनातील सर्व अधिकारी-कर्मचारी जोमाने कामाला लागले. त्याचाच परिणाम म्हणून सांगली जिल्ह्यात ३५ लाख ६५ हजार लाभार्थ्यांची नोंदणी झाली. राज्यातील शेतकरी, सर्वसामान्य माणूस, गरजू, वंचित अशा सर्वांना लाभ देण्यासाठी सर्व स्तरावरून प्रयत्न सुरू झाले. महिला सक्षमीकरणासाठी हे शासन सर्व प्रकारे प्रयत्नशील आहे. राज्य शासनाला केंद्र सरकारचे सहकार्य मिळत असल्याने राज्याचा विकास चौफेर होतोय. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशातील । पान २ वर

## उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचा मुख्यमंत्री करणार : उद्धव ठाकरे




कळंब : महाविकास आघाडी सरकारमध्ये मला काही अपरिहार्य कारणामुळे मुख्यमंत्री व्हावे लागले, परंतु मी बाळासाहेबांना वचन दिले आहे की शिवसैनिकालाच मुख्यमंत्री करणार त्यामुळे येणाऱ्या काळात शिवसेनेचा मुख्यमंत्री होणार असा आशावाद धाराशिव जिल्ह्यातील कळंब येथील आयोजित जनसंवाद सभेत शिवसेना ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी व्यक्त केला. यावेळी खासदार संजय राऊत ,सचिव मिलिंद नार्वेकर, खासदार ओमप्रकाश राजे निंबाळकर, आमदार कैलास घाडगे पाटील, माजी आमदार दयानंद गायकवाड,उपनेते शरद कोळी, तालुकाप्रमुख शिवाजी कापसे, माजी तालुकाप्रमुख रामलिंग आव्हाड, धाराशिवचे माजी नगराध्यक्ष मकरंद राजे निंबाळकर, शंकरराव बोरकर,अतुल कवडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे राज्य सरचिटणीस डॉ . प्रताप सिंह पाटील,काँग्रेसचे तालुकाध्यक्ष पांडुरंग कुंभार, युवा सेनेचे तालुकाप्रमुख मनोहर घोंगडे, संतोष लांडगे, लक्ष्मण आडसुळ ,संजय होळे, राजेश्र्वर पाटील, सचिन काळे ,आदी उपस्थित होते. उद्धव ठाकरे म्हणाले की भाजपने शिवसेनेच्या पाठीत खंजीर खुपसला आहे. अडीच अडीच वर्षे मुख्यमंत्री पद घ्यायचे ठरले होते परंतु गृहमंत्री अमित शहाने शब्द फिरवला, शिवसेनाही माझीच असून त्यांनी राहुल नार्वेकरांना लोकसभेची लालूच दाखवून निकाल फिरविला, आत्ता शिवसैनिक त्यांना धडा शिकविल्या शिवाय राहणार नाहीत, खासदार ओमराजे निंबाळकर व आमदार कैलास पाटील यांच्या कामाचे कौतुक करत तुम्हा दोघांनाही कायमस्वरूपी सभागृहात राहायचे आहे असे सांगून लोकसभा व विधानसभा निवडणुकीत दोघांची उमेदवारी फायनल असल्याचे यावेळी त्यांनी संकेत दिले.

खासदार संजय राऊत पुढे म्हणाले की ई.डी, सीबीआयला मी बांबू लावला त्यांना घाबरून हे फळफुटे पळाले, कळंब मध्ये निष्ठावंताचा जनसागर उसळला असून, येथील निष्ठावंताचा ओके पॅटर्न खासदार ओम प्रकाश राजे निंबाळकर व आमदार कैलास घाडगे/ पाटील राज्यभर राबऊ, गद्दारांना शिवसैनिकच काय देव सुद्धा माफ करणार नाही असा इशारा खासदार संजय राऊत यांनी फुटीर आमदारांना दिला.

मी मराठा समाजाला टिकणारे आरक्षण मिळावे म्हणून मी सात वेळा सभागृहात आवाज उठविला असे प्रतिपादन धाराशिव चे खासदार निंबाळकर यांनी सांगितले, आम्ही पहिल्यापासूनच या लढ्यात आहोत परंतु जरांगे पाटील फडणवीस वर बोलल्यावरच काही जणांची तोंडी उघडली त्यांना समाज महत्त्वाचा नाही आणि ते स्वतःचे धन लपविण्यासाठी भाजपमध्ये गेले असल्याचा आरोप त्यांनी या वेळी केला. आमदार कैलास पाटील यांनी प्रास्ताविक केले व प्रा. दिलीप पाटील व लक्ष्मण आडसुळ यांनी सूत्रसंचालन केले संजय होळे यांनी आभार मानले यावेळी शिवसैनिक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

## राष्ट्रपतींकडून सुधा मूर्ती यांची राज्यसभेवर निवड



नवी दिल्ली : प्रसिद्ध लेखिका, इन्फोसिस फाउंडेशनच्या अध्यक्षा आणि इन्फोसिसचे सह-संस्थापक नारायण मूर्ती यांच्या पत्नी सुधा मूर्ती यांची राज्यसभेवर निवड करण्यात आली आहे. या निवडीनंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एक्स या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर पोस्ट करून सुधा मूर्ती यांचं अभिनंदन केलं आहे. तसेच या निवडीबाबत आनंद व्यक्त केला. दरम्यान, राज्यसभेवर निवड झाल्यानंतर सुधा मूर्ती यांनी म्हटलं आहे की, त्या सध्या भारतात नाहीत. परंतु, महिला दिनानिमित्त त्यांना मिळालेली ही मोठी भेट आहे. देशासाठी काम करण्यासाठी एक नवीन जबाबदारी मिळाली आहे. मूर्ती यांनी या निवडीबाबत राष्ट्रपती आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानले आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एक्सवर केलेल्या पोस्टमध्ये म्हटलं आहे की, राष्ट्रपतींनी सुधा मूर्ती यांची राज्यसभेवर निवड केल्याचा मला खूप आनंद झाला आहे. सामाजिक कार्य आणि शिक्षण क्षेत्रात सुधा मूर्ती यांनी अतुलनीय आणि प्रेरणादायी योगदान दिलं आहे. राज्यसभेतील त्यांची उपस्थिती हा आपल्या नारी शक्तीचा एक सशक्त पुरावा आहे. आपल्या देशाचं भवितव्य घडवण्यात महिलांचा मोठा वाटा आहे. सुधा मुर्ती यांची राज्यसभेतील उपस्थिती महिलांची ताकद आणि क्षमता दर्शवते. यशस्वी संसदीय कार्यकाळासाठी मी सुधा मूर्ती यांना शुभेच्छा देतो. सुधा मूर्ती यांनी तीन महिन्यांपूर्वी नव्या संसद भवनाचा । पान २ वर

## रोहित पवार यांना मोठा धक्का! ईडीकडून बारामती ॲग्रोची १६१ एकर जमीन जप्त

मुंबई : राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांना ईडी मोठा धक्का बसला आहे. ईडीकडून बारामती ॲग्रोची प्रॉपर्टीवर जप्तची कारवाई करण्यात आली आहे. १६१ एकर जागा एऊ ने जप्त केली आहे. जपवळपास ५०.२० कोटी रुपयांच्या मालमत्तेवर कारवाई करण्यात आली आहे. बारामती ॲग्रोही आमदार रोहित पवार यांच्या मालकीची कंपनी आहे.





अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) बारामती ॲग्रो लिमिटेडच्या मालकीच्या कन्नड सहकारी साखर कारखान्याची (कन्नड एसएसके)च ५०.२० कोटींची मालमत्ता जप्त केली आहे. प्रिव्हेन्शन ऑफ मनी लाँडरिंग (पीएमएलए), २००२ च्या तरतुदी अंतर्गत महाराष्ट्र राज्याने साखर कारखान्यांच्या बेकायदेशीर विक्रीशी संबंधित प्रकरणात ही कारवाई करण्यात आली आहे. कन्नड, जिल्हा-औरंगाबाद येथे १६१.३० एकर जमीन, प्लांट आणि यंत्रसामग्री आणि साखर युनिटची इमारत जप्त करण्यात आली आहे. आयपीसी आणि भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्याच्या विविध कलमांखाली मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने नोंदवलेल्या एफआयआरच्या आधारे ईडीने तपास सुरू केला. चडउइ चे तत्कालीन अधिकारी आणि संचालकांनी त्यांचे नातेवाईक तसेच खाजगी व्यक्तींना योग्य । पान २ वर

## जिल्ह्यातील रेल्वे मार्ग व महामार्ग भूसंपादनाचा वाढीव मोबदला मिळवून देतो म्हणणाऱ्यांच्या भूलथापांना बळी पडू नये : जिल्हाधिकारी

*संबंधित शेतकऱ्यांनी वाढीव मोबदला मिळवून देतो म्हणणाऱ्या लोकांविरोधात जिल्हाधिकारी कार्यालयाच्या ०२१७-२७३१००० या दूरध्वनी क्रमांकावर तक्रार करावी, प्रशासनाकडून संबंधितावर त्वरित कारवाई करण्यात येईल

सोलापूर/प्रतिनिधी: सोलापूर उस्मानाबाद रेल्वे मार्ग भूसंपादन, संत तुकाराम पालखी महामार्ग, सुरत चेन्नई महामार्ग व अन्य प्रकल्पाच्या भूसंपादनासाठी जिल्हा प्रशासनाच्या वतीने प्रक्रिया सुरू आहे. या सर्व भूसंपादनाचा वाढीव मोबदला मिळवून देतो असे काही लोकांकडून शेतकऱ्यांना चुकीची माहिती दिली जात आहे किंवा वाढीव मोबदल्याचे आमिष दाखवले जात आहे. तरी सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना सोलापूर उस्मानाबाद रेल्वे मार्ग, सुरत चेन्नई महामार्ग भूसंपादन प्रक्रियेत शासकीय नियमाप्रमाणे जो मोबदला देय आहे तोच मोबदला मिळणार आहे. तरी शेतकऱ्यांनी वाढीव मोबदला मिळवून देतो म्हणणाऱ्याच्या भूलथापांना संबंधित बळी पडू नये, असे आवाहन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले आहे.



जिल्हाधिकारी आशीर्वाद पुढे म्हणाले की सोलापूर उस्मानाबाद रेल्वे मार्ग, सुरत चेन्नई महामार्ग व अन्य प्रकल्प अंतर्गत सोलापूर जिल्ह्यातील भूसंपादन प्रक्रियेच्या अनुषंगाने काही लोकांकडून शेतकऱ्यांची दिशाभूल सुरू असल्याची माहिती प्रशासनाला प्राप्त झालेली आहे. भूसंपादन कायदा २०१३ नुसार वाढीव मोबदला देण्याचा अधिकार जिल्हाधिकारी, भूसंपादन अधिकारी किंवा इतर कोणत्याही व्यक्तीला नाही. ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी महामार्गासाठी भूसंपादित करण्यात । पान २ वर

## लोकसभा निवडणुकीसाठी काँग्रेसची पहिली यादी जाहीर, राहुल गांधी 'या' जागेवरून निवडणूक लढवणार!

नवी दिल्ली : आगामी लोकसभा निवडणुकीची कोणत्याही क्षणी घोषणा होऊ शकते. हीच शक्यता लक्षात घेऊन भाजपाने नुकतेच आपल्या उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली. या यादीमध्ये एकूण १९५ जागांसाठी उमेदवार जाहीर करण्यात आले. त्यानंतर आता काँग्रेसनेही आज (८ मार्च) आपल्या उमेदवारांची पहिली यादी जाहीर केलीय. या यादीमध्ये एकूण ३९ उमेदवारांची नावे असून यात काँग्रेसचे खासदार राहुल गांधी, वरिष्ठ नेते शशी थरूर यांसारख्या दिग्गज नेत्यांचा समावेश आहे.



काँग्रेसने जाहीर केलेल्या पहिल्या यादीत एकूण ३९ नेत्यांचा समावेश आहेत. याच पहिल्या यादीत राहुल गांधी, शशी थरूर, भूपेश बघेल यांची नावे आहेत. राहुल गांधींना काँग्रेसने वायनाड या मतदारसंघातून उमेदवारी दिली आहे. २०१९ साली । पान २ वर

## अक्कलकोट तालुक्यात वंचितच्या तीन शाखेचे उद्घाटन



अक्कलकोट/प्रतिनिधी: वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष बाळासाहेब आंबेडकर यांचा झंजावात संपूर्ण महाराष्ट्रभर सुरू आहे, अनेक जिल्ह्यात मोठ्या मोठ्या सभा होत असून जनता स्वतःच्या खर्चाने हे सभा मोठ्या संख्येने यशस्वी करीत आहेत सध्याच्या वातावरणात वंचित बहुजन आघाडी या पक्षाला आणि बाळासाहेब आंबेडकर यांना सोबत घेतल्याशिवाय कोणीही सत्तेच्या दारापर्यंत जाऊ शकत नाही, ही ताकद निर्माण झालेली आहे.

त्याचाच एक भाग म्हणून अक्कलकोट वंचित बहुजन आघाडीच्या वतीने तीन शाखेचे उद्घाटन एकाच दिवशी करण्यात आले.

तडवळ येथे वंचित बहुजन युवक आघाडी शाखेचे उद्घाटन युवक आघाडी जिल्हाध्यक्ष पांडुरंग खांडेकर जिल्हा महासचिव अनिरुद्ध वाघमारे जिल्हा उपाध्यक्ष रवी थोरात आणि जिल्हा संघटक जालिंदर चंदनशिवे यांच्या शुभहस्ते करण्यात आला व निमगाव येथे वंचित बहुजन आघाडी जिल्हा उपाध्यक्ष मल्लिनाथ पाटील तालुका अध्यक्ष चंद्रशेखर मडीखांबे, युवक तालुका अध्यक्ष शिलामणी बनसोडे यांच्या शुभहस्ते करण्यात आला आणि गौडगाव येथे वंचित बहुजन आघाडी जिल्हा उपाध्यक्ष मालेगाव पाटील, तालुका अध्यक्ष चंद्रशेखर मडीखांबे, युवक आघाडी तालुका अध्यक्ष शिलामनी बनसोडे यांच्या हस्ते करण्यात आला

बाळासाहेब आंबेडकर यांचे हात बळकट करण्यासाठी त्यांचे विचार सर्व जाती धर्मांना बरोबर । पान २ वर

## जागतिक महिला दिनानिमित्त पी.बी. ग्रुपच्या वतीने सोलापूर महानगरपालिकेतील महिला कर्मचाऱ्यांचा सन्मान सोहळा

सोलापूर/प्रतिनिधी: प्रबुद्ध भारत चौक, बुधवार पेठ, मिलिंद नगर, येथे आज सकाळी १०.०० वाजता. प्रबुद्ध भारत तरुण मंडळ (पी.बी.ग्रुप) चे प्रमुख मार्गदर्शक राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते मा गटनेते आनंद (दादा) चंदनशिवे यांच्या पुढाकारातून हजारो महिलांच्या उपस्थितीमध्ये जागतिक महिला दिनानिमित्त सोलापूर महानगरपालिकेतील महिला कर्मचाऱ्यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मान सोहळा संपन्न झाला.



या कार्यक्रमाच्या सुरुवातीला राजमाता जिजाऊ, पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, माता रमाई यांच्या प्रतिमेस उपस्थित महिला मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला.

या कार्यक्रम प्रसंगी हेल्थ कन्सल्टिंग सौ. सुजाता रघोजी ताई, ड.सौ. स्वाती विशाल मस्के (राठोड), पद्मावती इंगळे, शोभाताई कापुरे, इलेक्ट्रिशन लोको पायलट पायल बनसोडे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते तथा सो.म.पा. मा गटनेते आनंद (दादा) चंदनशिवे, धूत साडी सेंटरचे प्रमुख पुरुषोत्तमजी धूत, सो.म.पा. मा. नगरसेवक गणेश पुजारी, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते इरफान शेख, विभागीय कार्यालय क्रमांक १ चे विभागीय अधिकारी प्रकाश सावंत, मुख्य आरोग्य निरीक्षक सूर्यकांत लोखंडे, श्रीमंत (आप्पा) जाधव, देविदास चिंचोळकर या मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले.

या कार्यक्रम प्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते तथा सो.म. पा. मा. गटनेते. आनंद (दादा) चंदनशिवे जागतिक महिला दिनानिमित्त आपले मनोगत व्यक्त करताना महिलांनी सक्षम व्हावे. महिलांनी स्वतःच्या पायावर उभे राहिले पाहिजे. । पान २ वर

## संपादकीय

### पक्ष फुटीने ग्रासलेले..

१५ जागांकरिता अलीकडे झालेल्या मतदानामध्ये हिमाचल प्रदेश आणि उत्तर प्रदेशमध्ये राजकीय घडामोडी झाल्याने केवळ देशातील सर्वसामान्य जनतेलाच नाही, तर विरोधी पक्षातल्या आमदारांनाही मोदी नेतृत्वाचे आकर्षण असल्याचे स्पष्ट झाले आहे. हिमाचल प्रदेशमध्ये काँग्रेसच्या सहा आमदारांनी, तर उत्तर प्रदेशमध्ये समाजवादी पार्टीच्या सात आमदारांनी क्रॉस व्होटिंग करत भाजप उमेदवारांना मतदान केले. १५ जागांसाठी झालेल्या निवडणुकीत भाजपचे दहा, काँग्रेसचे तीन आणि समाजवादी पार्टीचे दोन उमेदवार विजयी झाले. आमदारांनी क्रॉस व्होटिंग करणे हा काँग्रेस व सपालाच नाही, तर लोकसभा निवडणुकीच्या माध्यमातून देशाची सत्ता संपादन करण्याची स्वप्ने पाहणाऱ्या इंडिया आघाडीला मोठा धक्का आहे. भाजपला सत्तेवरून घालविण्यासाठी देशात फारसा जनाधार नसणाऱ्या राजकीय पक्षातील नेतृत्वाचा गोतावळा एकत्र येत त्यांनी इंडिया आघाडीची स्थापना केली आहे. इंडिया आघाडीतील घटकांना आज स्वत:चे राजकीय अस्तित्व टिकविण्यासाठी केविलवाणा संघर्ष करावा लागत आहे. स्वातंत्र्यापासून देशाची सत्ता उपभोगणाऱ्या काँग्रेस पक्षाला २०१४ आणि २०१९ साली झालेल्या लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीत सभागृहातील विरोधी पक्षनेतेपद मिळविण्याइतपत खासदार निवडून आणता आलेले नाही. महाराष्ट्रापुरता विचार करावयाचा झाल्यास शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसची आणि ठाकरेंच्या शिवसेनेची झालेली राजकीय वाताहत देशाला जवळून पाहावयास मिळालेली आहे. त्यांना स्वत:चे आमदारच नाही तर पक्ष व निवडणूक चिन्हदेखील सांभाळता आलेले नाही. ठाकरेंपासून शिवसेना स्थापनेपासूनचे सर्व कर्ते शिलेदार दुरावले, तर शरद पवारांना त्यांच्या पुतण्याला सांभाळता आले नाही. त्यामुळे इंडिया आघाडीत पश्चिम बंगालच्या ममता बॅनर्जींसारखे तुरळक अपवाद सोडले तर फारसे मातब्बर राजकीय घटक नाहीत. भाजपची पक्षसंघटना पोलादी आहे. या संघटनेला खिंडार पडणे अलीकडच्या काळात तर शक्यच नाही. विरोधी पक्षातले मातब्बर दररोज भाजपमध्ये मोठ्या संख्येने दाखल होत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या माध्यमातून देशातील विकासकामांना गती मिळालेली आहे. परदेशातही देशाचा नावलौकिक वाढीस लागलेला आहे. भाजपकडे मतदारांना सामोरे जाताना केलेल्या विकासकामांची यादी आहे, देशाच्या प्रगतीचे नियोजन आहे. त्या तुलनेत इंडिया आघाडीकडे काय आहे? तर सध्या इंडिया आघाडीतील अनेक पक्षांना फुटीने ग्रासलेले आहे.

# दर्शनाळ येथे विविध मनोरंजनाने जागतिक महिला दिन मोठ्या उत्साहात साजरा




दर्शनाळ/देविदास माने: अक्कलकोट तालुक्यातील दर्शनाळ येथे जागतिक महिला दिनानिमित्त सर्व प्रथम सावित्रीबाई फुले, अहिल्याबाई होळकर, रमाबाई आंबेडकर, जिजाबाई, यांच्या प्रतिमेचे पूजन जेष्ठ महिला माजी उपसरपंच सौ.फिरोजा नबीलाल चौधरी, विद्यमान सदस्य सौ.गौरी सुधाकर सराटे, विद्यमान उपसरपंच सौ.गुलशन नासीर चौधरी, विद्यमान सदस्य सौ. प्रियांका देविदास माने, यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

या जागतिक महिला दिना मध्ये दहा महिला बचत गट सहभाग नोंदविले होते मनोरंजन म्हणून संगीत खुर्ची घेण्यात आले त्यामध्ये आम्रपाली महिला बचत गटाचे सचिव सौ. रुकसाना इनूस शेख एक नंबर, सद्गुरु महिला बचत गटाचे अध्यक्ष सौ. रेवती मल्लिनाथ व्हनमुगे दोन नंबर आले यांचा सत्कार अंगणवाडी सेविका शोभा हाडंगे व निर्मला तंबाके यांच्या हस्ते भेट म्हणून वस्तू साडी देण्यात आले. यावेळी महिला बचत गटाचे सर्व अध्यक्ष सचिव व त्यांचे सभासद ग्रामपंचायत कर्मचारी व माता भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# खो खो स्पर्देतिल विजेता उर्दु शाळेतील विध्यार्थ्यांच्या दुधनी मुस्लिम समाजाच्या वतीने सत्कार



दुधनी/प्रतिनिधीः जिल्हा परिषद प्राथमिक उर्दू शाळा दुधनी येथील विद्यार्थ्यांनीच्या महाराष्ट्र राज्य उर्दू शिक्षक संघटना यांच्या वतीने राष्ट्रीय उर्दू दिनानिमित्त आयोजित केलेल्या जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धांमध्ये खोखो व लंगडी या स्पर्धेत सहभागी होऊन उत्कृष्ट विजय मिळविल्याबद्दल व जिल्हास्तरीय खो-खो स्पर्धेमध्ये दुसरा क्रमांक मिळविल्याबद्दल मुस्लिम जमात दुधनी तर्फे सर्व विजेता मुलांना स्कूल बॅग देऊन सन्मानित करण्यात आले. हा कार्यक्रम दुधनी उर्दू शाळेत संपन्न झाला .या कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री कासिम साहब खैराट होते. यावेळी मुस्लिम समाजाचे अध्यक्ष श्री जिलानी नाकेदार,व शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष श्री युसुफ जीडगे यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन उर्दू शाळेतील विद्यार्थिनी कुमारी यास्मिन मुजावर यांनी केले. यावेळी गुलाब रेऊर ,वाजिद खैराट ,मोहम्मद साहब बांगी, इस्माईल मनियार, हमीद भाई बडे खान, चिंनु मणियार, मौला पठाण, नाजिम बळूर्गी , गौस शेखजी ,मोसिन मोमीन ,उमर मणियार रिपाईचे सैदप्पा झळकी 'आदि उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्रीमती लतिफा बांगी व बागवान यांनी परिश्रम घेतले. शेवटी श्री फैयाज सुतार आभार मानले.

# पुरंदर तालुक्यातील पोलीस पाटलांसाठी आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण

पुरंदर/प्रतिनिधी :जिल्हाधिकारी कार्यालय पुणे व तहसील कार्यालय पुरंदर यांच्या वतीने तालुकास्तरीय ापत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण दिनांक ०७/०३/२०२४ व दिनांक ०८/०३/२०२४ रोजी डॉ. बाबासाहेब




आंबेडकर सांस्कृतिक भवन सासवड येथे दिनांक७/३/२०२४ व ८/३/२०२४ आयोजित करण्यात आले, पहिल्या दिवशी अचानक उद्भवणारी आपत्ती उदा. आग लागणे, शॉट सर्किट, पूर येणे, एखाद्यास अटॅक येणे, रस्ते अपघात, हाड मोडणे, जखम होणे, सर्प दंश इत्यादी अचानक येणाऱ्या आपत्तीवर करण्यात येणारे उपाय याबद्दल सविस्तर माहिती देण्यात आली. यशदा पुणे येथील श्री अतुल गायकवाड सर, श्री महाजन सर यांनी उपस्थित सर्व पोलीस पाटलांना उत्तम प्रकारे मार्गदर्शन केले. दुसऱ्या दिवशी श्री युवराज नागटिळक सर व श्री महाजन सर यांनी प्रात्यक्षिक करून सर्व आपत्ती व्यवस्थापना बद्दल छान अशी माहिती सांगून प्रत्यक्ष त्या ठिकाणी प्रात्यक्षिके केली उदा डोक्याला जखम झाल्यानंतर बँडेज कसं बांधायचं, पाय फ्रॅक्चर झाल्यानंतर त्यावर कसं बांधायचं, हात फ्रॅक्चर झाल्यानंतर तो कसा गळ्यामध्ये बांधायचा तसेच जखमी व्यक्तीला एका व्यक्तीने उचलून उपचारासाठी कसे न्यायचं याचे प्रात्यक्षिक करण्यात आले , तसेच पूर आल्यानंतर ओढा किंवा नदी दोरीच्या साह्याने कशी पार करायची याबद्दलही माहिती दिली आपत्कालीन स्थितीत दोरीला गाठी बांधून त्याची शिडी कशी तयार करायची याचेही प्रात्यक्षिक करून दाखवले. प्रवासामध्ये एखाद्या इसमास फिट आली तर अचानक उद्भवलेल्या प्रसंगांमध्ये त्यावर कसे उपाय करायचे यावरही छान मार्गदर्शन करण्यात आले.

सदर प्रशिक्षणाच्या वेळी पुरंदर तहसीलचे प्रभारी नायब तहसीलदार श्री गवारे साहेब व पुरंदर तालुक्यातील सासवड पोलीस स्टेशन व जेजुरी पोलीस स्टेशन हद्दीतील सर्व पोलीस पाटील बंधू आणि भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते, या आपत्तीकालीन परिस्थिती व्यवस्थापन प्रशिक्षणाचा निश्र्चितच सर्व पोलीस पाटलांना खऱ्या अर्थाने उपयोग होईल असे उपस्थित सर्व पोलीस पाटील बंधू आणि भगिनी यांनी यावेळी सांगितले.

# वागदरी येथे सागर दादा कल्याणशेट्टी युवा मंच वतीने महिला दिना निमित्त १०१ महीलाचा सन्मान

अक्कलकोट/प्रतिनिधीः हन्नुर गावाचे उपसरपंच युवा नेता सागर दादा कल्याणशेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली जागतिक महिला दिनानिमित्त वागदरी ता. अक्कलकोट येथे सागर दादा कल्याणशेट्टी युवा मंच वतीने महिला दिना निमित्त १०१ महीलाचा फेटा बांधून सन्मान करण्यात आले सागर दादा कल्याणशेट्टी युवा मंच अध्यक्ष शाम बाबर यांनी जागतिक महिला दिनानिमित्त



औचित्य साधून वागदरी मध्ये विविध क्षेत्रात कार्यरत महिलांचे सन्मान करण्यात आले यावेळी संघर्ष सामाजिक संस्थेचे उपाध्यक्ष महादेव सोनकवडे वागदरी ग्रामपंचायतचे उपसरपंच पंकज सुतार यांच्या प्रमुख उपस्थितीत सन्मान सोहळा घेण्यात आले यावेळी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वागदरी मनीषा कुन्हाळे मॅडम, अनुसया कलशेट्टी मॅडम ,गिरी मॅडम रेखा सोनकवडे मॅडम, कन्नड माध्यम शैलजा पोमाजी मॅडम, मनोळी मॅडम, महानंदा पोमाजी, रेणुका चौगुले, पोलीस मित्र ललिता भटारे,जगदेवी मुरळी,अशा अनेक विविध क्षेत्रात उल्लेखनी कामगिरी करणाऱ्या महिला माता-भगिनींचा मोठ्या संख्येने उपस्थित होते

पान १ वरुन

## अक्कलकोट तालुक्यात वंचितच्या तीन..

घेऊन त्याचे विचार तळागाळात रुजवण्यासाठी या तिन्ही शाखेचे सर्व पदाधिकारी अतिशय मेहनत घेऊन या शाखा उद्घाटन कार्यक्रम यशस्वी करून दाखवले.याप्रसंगी सम्यक विद्यार्थी आंदोलन राज्य प्रवक्ते रवी पोटे, तालुका संघटक बबन गायकवाड, आनंद मोरे, तालुका महासचिव नागेश् हरवाळकर, तालुका उपाध्यक्ष अमृत सोनकांबळे,शहराध्यक्ष विशाल ठोंबरे, शहर उपाध्यक्ष शिवाजी चौगुले, युवक आघाडी शहराध्यक्ष संदीप बाळशंकर, युवक आघाडी तालुका उपाध्यक्ष सोमनाथ धसाडे, सागर बनसोडे प्रदीप बनसोडे, युवक आघाडी तालुका संघटक हनुमंत जाधव, योगेश सोनकांबळे आकाश गायकवाड अमोल सोनकांबळे तडवळ शाखाध्यक्ष शरणाप्पा शिवशरण, मल्लू गायकवाड चंद्रकांत गायकवाड, संतोष कांबळे,निमगाव शाखा अध्यक्ष शेखर गायकवाड उत्तम गायकवाड श्याम गायकवाड गौतम गायकवाड संतोष गायकवाड, गौडगाव शाखा अध्यक्ष अण्णाप्पा सोनकांबळे, महासचिव शंकर कुरणे, संजय सोनकांबळे अधिक कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते

## जागतिक महिला दिनानिमित्त पी.बी...

महिलांनी शिक्षणाला प्राधान्य दिले पाहिजे. अशाप्रकारे मनोगत व्यक्त केले.

यानंतर विविध मान्यवरांच्या हस्ते उपस्थित हजारो महिला कर्मचाऱ्यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.या कार्यक्रम प्रसंगी अशा लोखंडे, ईलजम्मा कावल, शोभा इंगळे सरु शिंदे, शशिकला पिडगूलकर, नागरबाई कांबळे, इंडियन तिरंगा क्लासेसच्याा सर्व मुली, पल्लवी कांबळे देवका शिरसट, मंजू घेचंद, पूनम घेचंद, वंदना गायकवाड, ताई वायदंडे, भामा कांबळे, पल्लवी गायकवाड, नीलम्मा चीनापागा, नागम्मा कावल, पारूबाई जाधव, छाया सातपुते, वंदना मिसाळ, सुमन कांबळे, उषा चंदनशिवे, अनुराधा कृष्णा, पद्मा जमूल, बिना लालबेदी, कविता सर्वगोड, शोभा देडे, सवित्रा शिवशरण, सविता गवळी, अनुसया शिवशरण, नरसम्मा केशपागा, शीला वाघमारे, सविता भुताळे, सुरेखा सिताफळे, रमा राठोड, शोभा शिवशरण, पार्वती जाधव, मीना जानराव, रुक्मिणी गायकवाड, पल्लवी गायकवाड, चंद्रकला कांबळे, अविंदा वाघमोडे, शोभा कापुरे, रूपाली राठोड, विमल चव्हाण, अनिता माने, रेखा बारसकर, सरला भोसले, कमल गायकवाड, करुणा माळाळे, छाया मोरे, मंगम्मा केशपागा, लक्ष्मी अंकुश, वनिता वाघमोडे, शिल्पा कसबे, लक्ष्मी गायकवाड, पुष्पा मुनगानोल, शोभा इंगळे, उज्वला शिवशरण, वाली परमार, सुधा झेंडे, सुभद्रा आळगीकर, निर्मला शिंदे, सुलक्षणा गायकवाड, सुनीता मोरे, चन्नम्मा गंधम, वसंता सांगे, उषा जोगदिया, जमनाबाई धुम्बड, लक्ष्मी मुनगल, मंगल वाघमारे, कांताबाई रणदिवे, गोदाबाई सरवदे, रूपाली भोसले, संगीता भोसले, पोर्णिमा वाघमोडे, नालंदा बनसोडे, नागर बनसोडे, सुषमा बनसोडे, आराध्या बाबरे, समृद्धी सावळे, स्वाती तळभंडारे, बेबी भालेराव, नूतन तळभंडारे, शुभदा बडेकर, नालंदा बडेकर, मीना कावठे, यमुना माळाले, तुळजाबाई शिंदे, सुधा कापुरे, सरोजा सांगे, सुषमा भोसले, रेणुका चव्हाण, मुक्ता शिंदे कुसुमबाई बाबरे शारदा दत्तू स्वप्नाली बनसोडे, दिशा शिंदे, राजश्री शिंदे व हौसाबाई चौधरी आदी महिला उपस्थित होत्या.

या कार्यक्रम प्रसंगी आरोग्य निरीक्षक नागसेन बच्चु, आरोग्य निरीक्षक रोहित गवळी, आरोग्य निरीक्षक बसवराज जमादार, आरोग्य निरीक्षक धीरज वाघमोडे, आरोग्य निरीक्षक सचिन वडवेराव, आरोग्य निरीक्षक पंकज क्षीरसागर, आरोग्य निरीक्षक जयकुमार कांबळे, भारत बाबरे, ड. विशाल मस्के,चंद्रकांत सोनवणे, गौतम इंगळे, संभाजी जौजट, धोंडीबा कापुरे, प्रकाश माने, पी.बी. ग्रुपचे अध्यक्ष अमित बनसोडे,, सुरज वाघमोडे, शरद सोनवणे, गौतम शिंदे, लखन चंदनशिवे, जयराज सांगे, भीमा मस्के, संतोष वाघमारे, रोहन तळभंडारे, अशांना सांगे, सिकंदर शेख, राजू जाधव, आप्पा दोडमनी इत्यादी उपस्थित होते.

## राष्ट्रपतींकडून सुधा मूर्ती यांची..

दौरा केला होता. त्यावेळी त्यांनी संसदेच्या दोन्ही इमारती पाहिल्या. त्यानंतर त्या म्हणाल्या, ही इमारत खूपच सुंदर आहे. मला प्रदीर्घ काळापासून या ठिकाणी भेट द्यायची होती आणि आज तो योग आला दरम्यान, त्यावेळी मूर्ती यांना प्रश्न विचारण्यात आला होता की, तुम्ही राजकारणात यायचा विचार केला आहे का? यावर सुधा मूर्ती म्हणाल्या, मी जिथे आहे तिथे खुश आहे. मला राजकारणात वगैरे मुळीच यायचं नाही. सुधा मूर्ती इन्फोसिस फाउंडेशनच्या अध्यक्षा आहेत. तसेच त्या लेखिका म्हणूनही जगभर प्रसिद्ध आहेत. सुधा मुर्ती या महिला आणि लहान मुलांसाठी काम करत आहेत. त्यांची संस्थादेखील यासाठी देशाच्या विविध भागांमध्ये काम करतेय.

## लोकसभा निवडणुकीसाठी

त्यांनी वायनाड आणि अमेठी या दोन मतदारसंघांतून निवडणूक लढवली होती. यावेळी मात्र ते पुन्हा एकदा अमेठीतून निवडणूक लढवणार का? हा प्रश्न अद्याप कायम आहे. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शशी थरूर यांना त्यांच्या तिरुअनंतपुरम या मतदारसंघातूनच उमेदवारी देण्यात आली आहे. त्यांना काँग्रेसने सलग तिसऱ्यांदा याच मतदारसंघातून तिकीट दिले आहे.

छत्तीसगडचे माजी मुख्यमंत्री भूपेश बघेल हे पहिल्यांदाच लोकसभेची निवडणूक लढवणार आहेत. त्यांना काँग्रेसने छत्तीसगडच्या राजनंदगाव या मतदारसंघातून तिकीट दिले आहे. काँग्रेसच्या पहिल्या यादीत काँग्रेसचे सरचिटणीस केसी वेणूगोपाल यांचादेखील समावेश आहे. ते केरळमधील अलापुझ्झा या जागेवरून निवडणूक लढवतील. २००९ साली वेणूगोपाल यांनी याच जागेवर विजयी कामगिरी करून दाखवली होती. कर्नाटकचे उपमुख्यमंत्री डी के शिवकुमार यांचे बंधू डी के सुरेश यांनादेखील काँग्रेसने पहिल्याच यादीत तिकीट दिले आहे. ते बंगळुरू ग्रामीण या मतदारसंघातून निवडणूक लढवतील.

## रोहित पवार यांना मोठा धक्का!..

प्रक्रियेचे पालन न करता एसएसकेची फसवणूक केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाचे आमदार रोहित पवारांची यापूर्वी अनेकदा ईडी चौकशी झाली आहे. मुंबईतल्या ईडी ऑफिसमध्ये त्यांच्यासोबत त्यांच्या पत्नी कुंती पवार यांचीही ईडी चौकशी झाली होती. बारामती ॲग्रो कथित गैरव्यवहार प्रकरणी २४ जानेवारीलाही त्यांची १२ तास चौकशी झाली होती. ईडी चौकशीविरोधात शरद पवार गट आक्रमक झाला होता. तर, ईडीच्या कारवाईचा निषेध करण्यासाठी शरद पवार गटाकडून जोरदार शक्तीप्रदर्शन करण्यात आले.

यापूर्वी बारामती ॲग्रोवर ईडीनं छापेमारी केली होती.आमदार रोहित पवार यांच्या बारामती ॲग्रो कंपनीशी संबंधित ठिकाणांवर एऊनं छापेमारी केली होती. पुणे, बारामती आणि इतर ठिकाणी ईडीकडून छापेमारी करण्यात आली होती. ईडीच्या पथकाने एकूण ६ ठिकाणी धाडसत्र राबवले होते. ईडीने मनी लॉन्ड्रिंग प्रकरणात ही कारवाई केली होती. त्याचसोबत रोहित पवारांच्या छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या कन्नड साखर कारखान्यावरही आयकर खात्याने छापे मारले होते.

## जिल्ह्यातील रेल्वे मार्ग व महामार्ग ..

येत आहेत त्यांना भूसंपादन कायद्यातील तरतुदीप्रमाणे मोबदला खात्रीशीरपणे मिळणार आहे. तरी जिल्ह्यातील संबंधित रेल्वेमार्ग, महामार्ग भूसंपादन प्रक्रियेतील शेतकऱ्यांनी वाढीव मोबदला देतो म्हणून सांगणाऱ्याच्या भूलथापांना बळी पडू नये व स्वत:ची फसवणूक करून घेऊ नये, असे आवाहन त्यांनी केले. तसेच काही लोक शेतकऱ्यांना भूसंपादन कायद्याप्रमाणे मोबदला मिळणार असला तरी कमी मोबदला मिळणार असून आपण जास्तीचा मोबदला मिळवून देतो असे सांगत आहेत. तरी कायद्याप्रमाणे जेवढा मोबदला मिळणार आहे तेवढा बदला शेतकऱ्यांना खात्रीशीरपणे मिळणार आहे याची नोंद घ्यावी, असे त्यांनी सांगितले. जिल्ह्यातील कोणत्याही शेतकऱ्यांची अशी फसवणूक करणाऱ्या संबंधित लोकांविषयी तात्काळ जिल्हाधिकारी कार्यालयातील ०२१७/२७३१००० या दूरध्वनी क्रमांकावर तक्रार नोंदवावी असे आवाहन जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी केले आहे. तसेच शेतकऱ्यांची तक्रार प्राप्त झाल्यावर तात्काळ संबंधित फसवणूक करणाऱ्या किंवा चुकीची माहिती देणाऱ्या व्यक्ती विरोधात प्रशासनाच्या वतीने कारवाई करण्यात येईल असेही त्यांनी निर्देशित केले आहे.

## शासनाच्या लोकोपयोगी धोरणांमुळे

सुमारे २५ कोटी जनतेला दारिद्र्यरेषेच्या वर आणण्याचे काम केले आहे. दुष्काळी भागासाठी वॉटर ग्रीड करण्याचा निर्णय घेतला. आजपर्यंत ५०० निर्णय घेतले. आतापर्यंत १५ लाख हेक्टर जमीन सिंचनाखाली आणण्याचं काम सरकारने केले. सरकारने लेक लाडकी योजना सुरू केली. तसेच ५ लाखापर्यंतचे मोफत उपचार देण्याचा निर्णय घेतला. तर उद्योग व्यवसाय वाढीसाठी सरकारने पाच लाख कोटीचे करार केल्याचे सांगून त्याचा चांगला परिणाम लवकरच दिसेल. सांगली जिल्ह्यातील चांदोली प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न सोडवण्यासाठी लवकरच बैठक घेणार असल्याचे ते म्हणाले.पालकमंत्री डॉ. सुरेश खाडे म्हणाले की, सांगली जिल्ह्याचे नाव काढलं की, डोळ्यासमोर येतो या जिल्ह्याने लढलेला स्वातंत्र्यसंग्राम आणि मोठमोठे उद्योजक. अनेक नामवंत व्यक्तिमत्व, उत्तम प्रशासक, दूरदृष्टी असलेले नेते राजकीय नेते, समाजकारणी या मातीने घडवले. राज्य सरकारच्या भक्कम पाठिंब्यामुळे सांगलीची विकासाकडे जोमाने वाटचाल सुरू आहे. यावेळी खासदार धैर्यशील माने यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

प्रारंभी कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या अर्धाकृती पुतळ्यास पुष्पहार घालून करण्यात आली. या कार्यक्रमात विविध लाभार्थ्यांना प्रातिनिधीक स्वरूपात मुख्यमंत्री श्री. शिंदे तसेच पालकमंत्री डॉ. डॉ. खाडे व अन्य मान्यवरांच्या हस्ते शासकीय योजनांचा लाभ देण्यात आला. या कार्यक्रमासाठी विविध शासकीय विभागांच्या प्रमुखांसह हजारोंच्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

दरम्यान या कार्यक्रमात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अन्य मान्यवरांच्या हस्ते 'सांगली बहु चांगली', या कॉफी टेबल बुक व सांगलीची विविध क्षेत्रातील महती व प्रगती सांगणाऱ्या 'कृष्णामृत' या दोन पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# दलित मुस्लिमांची एकजूट रिपब्लिकन पक्षाला सत्तेत सन्मानाची भागीदारी मिळवून देईल : केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले

मुंबई : रिपब्लिकन पक्ष दलितांमधील विविध गटांना एकत्र करीत आहे .दलितांच्या एकजुटीला मुस्लिमांच्या एकजुटीने साथ दिली पाहिजे. देशभरात दलित मुस्लिमांची एकजूट आपण उभारत आहोत.

दलित मुस्लिमांच्या एकजुटीचे मतदान रिपब्लिकन उमेदवारांना मिळत राहिल्यास रिपब्लिकन पक्षाला लोकमान्यते बरोबर राजकीय मान्यता मिळेल. रिपब्लिकन पक्षाला सत्तेत सन्मानाची भागीदारी मिळेल. त्यामुळे देशभरात दलित मुस्लिमांसोबत सर्व बहुजन समाजाची एकजूट रिपब्लिकन पक्षाच्या निळ्या झेंड्याखाली करण्यासाठी कामाला लागा असे आवाहन आज रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्यायालयाचे मंत्री नामदार रामदास आठवले यांनी केले.



जोगेश्र्वरी पश्र्चिम येथील किल्लेदार ग्राउंडवर रिपब्लिकन पक्षाच्या वतीने रिपाइंचे मुंबई उपाध्यक्ष सोहेल शेख यांच्या नेतृत्वात दलित मुस्लिम एकता परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. त्यात उद्घाटक म्हणून नामदार रामदास आठवले यांनी प्रमुख मार्गदर्शन केले . यावेळी स्थानिक खासदार गजानन कीर्तिकर ; रिपाइंचे राष्ट्रीय सरचिटणीस अविनाश महातेकर; राज्य सरचिटणीस गौतम सोनवणे; रिपाइं चे मुंबई अध्यक्ष सिद्धार्थ कासारे ; भाजपचे प्रवक्ते आसिफ भामला; रिपाइं जिल्हा अध्यक्ष प्रकाश जाधव; आदी अनेक मान्यवर उपस्थित होते.

आगामी लोकसभा निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाला महाराष्ट्रात दोन जागा मिळाल्या पाहिजेत. शिर्डी या लोकसभा मतदारसंघात मी स्वतः निवडणूक लढणार आहे. भाजपने जर मला लोकसभेची जागा सोडली तर मी कमळ चिन्हावर निवडणूक लढणार नाही तर मी माझ्या रिपब्लिकन पक्षाच्या चिन्हावर निवडणूक लढेल .यापूर्वी मी पंढरपुरातून खटारा या निवडणूक चिन्हावर निवडून आलो आहे .त्यापूर्वी मी मुंबईतून रिपब्लिकन पक्षाच्या उगवता सूर्य चिन्हावर निवडून आलो होतो . रिपब्लिकन पक्षाचे अस्तित्व स्वतंत्र आहे .रिपब्लिकन पक्षाला राजकीय मान्यता प्राप्त पक्ष करण्यासाठी रिपाइंच्या स्वतंत्र चिन्हावर आम्हाला निवडणूक लढणे गरजेचे आहे .मी राज्यसभा खासदार पदी रिपब्लिकन पक्षाच्या एबी फॉर्मवर निवडून आलेलो आहे. त्यामुळे लोकसभेची निवडणूक विधानसभेची निवडणूक रिपब्लिकन पक्ष स्वतःच्या चिन्हावरच लढेल. रिपब्लिकन पक्षाला मान्यता प्राप्त पक्ष करण्यासाठी स्वतःचे स्वतंत्र निवडणूकचिन्ह प्राप्त करण्यासाठी दलित मुस्लिम आदिवासी बहुजन सर्वांची एकजूट रिपब्लिकन पक्षाच्या झेंड्याखाली करणे आवश्यक आहे त्यासाठी कार्यकर्त्यांनी लोकांना आपल्या पक्षात जोडण्यासाठी कामाला लागावे असे आवाहन नामदार रामदास आठवले यांनी केले.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदींवर काँग्रेस आणि विरोधी पक्ष खोडसाळ आरोप करतात.मात्र प्रधानमंत्री मोदी हे दलित आणि मुस्लिमांच्या विरोधात नाहीत .ते संविधानाच्या विरोधात नाहीत. काँग्रेसच्या खोट्या प्रचाराला बळी पडू नका. नरेंद्र मोदी हे संविधानाचे समर्थक आहेत. महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी देशाला दिलेले संविधान हे मजबूत संविधान आहे. संविधानाला कोणी हात लावू शकत नाही .कुणाच्या बापाच्या बापालाही संविधानाला हात लावण्याची हिम्मत होणार नाही. जर संविधानाला हात लावण्याचा प्रयत्न झाला तर देशात आग लागेल असा इशारा नामदार रामदास आठवले यांनी यावेळी दिला.केंद्र सरकार च्या विविध योजना या दलित मुस्लिम आणि सर्व समाज घटकांना लाभ देणाऱ्या योजना आहेत याबगतची माहिती ना. रामदास आठवले यांनी यावेळी दिली. दलित मुस्लिम एकता परिषदेत रिपब्लिकन पक्षाने प्रचंड शक्ती प्रदर्शन घडवले यावेळी हजारो दलित मुस्लिम नागरिक मोठ्या संख्येने एकजुटीने उपस्थित होते.

# भाविकांच्या सोईसह वटवृक्ष मंदीराचे उपक्रम उल्लेखनीय

## विशेष पोलीस महानिरीक्षक फुलारी यांचे मनोगत



अक्कलकोट/प्रतिनिधीः येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे स्वामी दर्शनासाठी मंदीरात येणाऱ्या भाविकांकरीता असलेल्या सोई सुविधा या सर्वोत्तम दर्जाच्या असून या सह मंदिर समितीचे अध्यक्ष महेश इंगळे यांचे सर्व धार्मिक सामाजिक उपक्रम उल्लेखनीय असल्याचे प्रतिपादन कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक सुनिल फुलारी यांनी केले. ते नुकतेच येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानास भेट देवून श्री स्वामी समर्थांचे मनोभावे दर्शन घेतले. यावेळी मंदीर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन व नगरसेवक महेश इंगळे यांनी त्यांचा श्रींचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देवून यथोचित सत्कार केला. यावेळी मंदिरातील वटवृक्षाखालील स्वामींच्या अखंड नंदादीप मंदिरास चांदीचे नक्षीकाम नुकतेच करण्यात आले आहे, त्याचा शुभारंभही पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी यांच्या हस्ते करण्यात आला व या स्थानाचेही फुलारी यांनी मनोभावे दर्शन घेतले. याप्रसंगी मंदीर समितीच्या विवीध कार्याचा आढावा घेतल्यानंतर बोलताना पोलीस महानिरीक्षक सुनिल फुलारी यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. यावेळी सोलापूरचे पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, उपविभागीय पोलीस अधिकारी विलास यामावार, नॉर्थ पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राजेंद्र टाकणे, साऊथ पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक महेश स्वामी, वळसंग पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अनिल सनगले, मंदार महाराज पुजारी, गोपनीय खात्याचे धनराज शिंदे, गजानन शिंदे, मंदीर समितीचे सेक्रेटरी आत्माराम घाटगे, विश्र्वस्त महेश गोगी, प्रथमेश इंगळे, शिवशरण अचलेर, श्रीशैल गवंडी, संजय पवार, श्रीकांत मलवे, गिरीश पवार, विपूल जाधव, प्रसाद सोनार इत्यादी उपस्थित होते.

# निफाड नगरपंचायतीच्या वतीने विविध विकास कामांचा शुभारंभ




निफाड/प्रतिनिधी :निफाड येथे महाशिवरात्रीच्या शुभ मुहूर्तावर निफाड नगरपंचायत चे मार्फत प्रभाग क्र.७.व प्रभाग क्र.१० मध्ये विविध विकास कामांचा शुभारंभ माजी.नगराध्यक्ष .राजाभाऊ शेलार यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला या प्रसंगी. प्रभाग क्रं .दहा च्या नगरसेविका तथा नगराध्यक्षा डॉ. कविता नितीन धारराव, प्रभाग क्रं. सात च्या नगरसेविका विमलताई जाधव उपनगराध्यक्ष अनिल पा. कुंदे, संगमेश्र्वर पतसंस्थेचे चेअरमन राजाभाऊ राठी, माजी.नगराध्यक्षा शारदाताई कापसे, रत्नमालाताई कापसे, नगरसेवक संदीप शिंदे, भाजपा जिल्हाध्यक्ष शंकरराव वाघ.माजी.नगरसेवक देवदत्त कापसे आदी मान्यवर उपस्थित होते यावेळी मामलेदार चौक काँक्रीटीकरण व सुशोभिकरण ,माणकेश्र्वर चौक काँक्रीटीकरण व सुशोभिकरण, ,मस्जिद चौक ते शिंपी गल्ली रस्ता काँक्रीटीकरण, ,व्यायामशाळा इमारत लोकार्पण करण्यात आले.यावेळी ,सुहास सुरळीकर,मधुकर धारराव, माणकेश्र्वर वाचनालयाचे अध्यक्ष मधुकर शेलार .डॉ.उत्तमराव डेर्ले. कैलास धारराव,नंदलाल चोरडिया,दिलीप कुंभार्डे ,माधव धारराव,राजेंद्र कुंदे,माणिकराव खालकर,डॉ.भूषण राठी, डॉ.रुपेश वाघ,रघुनाथ धारराव,मनिष धारराव,भानुदास धारराव,मुन्शी पटेल, संजय धारराव, सचिन धारराव,सुरेश तौवर तसेच विश्र्वेश्र्वर मित्र मंडळाचे सर्व सहकारी आदि मान्यवर उपस्थित होते

# कौठाळी येथील पंचगंगा चौक ते धुमाळ नगर रस्त्याच्या कामाचे उद्घाटन



पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर तालुक्यातील कौठाळी येथे पंचगंगा चौक ते धुमाळ नगर डांबरीकरण रस्त्याच्या कामाचे उद्घाटन जिल्हा नियोजन समितीचे सदस्य महेश साठे यांच्या हस्ते करण्यात आले. या रस्त्याच्या कामासाठी महाराष्ट्राचे संवेदनशिल मुख्यमंत्री श्री एकनाथजी शिंदे साहेब याच्या माध्यमातुन श्री महेश (नाना )साठे, आ.प्रशांतराव परिचारक, आ.समाधान आवताडे, राष्ट्रवादीचे प्रांतिक सदस्य कल्याणराव काळे यांच्या प्रयत्नामुळे रस्त्याच्या कामास निधी उपलब्ध झाला आहे. यावेळी सरपंच अनिता नागटिळक, ईश्र्वरा धुमाळ, मोहन नागटिळक, धोंडीराम वाघमोडे, अरुण नागटिळक, महादेव गाढवे, शंकर गोडसे, रघुनाथ गोडसे,अनिल नागटिळक,दिलीप इंगळे, उद्योगपती अनिल नागटिळक,बाळासाहेब धुमाळ परमेश्र्वर धुमाळ, संदीप पाटील, अरुण धुमाळ,सचिन आटकळे, सचिन धुमाळ, बापू धूमाळ,वसंत नागटिळक, बंडू धुमाळ, जहांगीर इनामदार, संतोष धुमाळ, दत्ता धुमाळ, सुखदेव उगळे, तानाजी बागल, विकास नागटिळक,हरी सलमपुरे, दिलीप लवटे, शंकर वाघमारे,दिलीप भुईटे, राजू धुमाळ, शिंदे इंजिनिअर, यांच्यासह बहुसंख्य मान्यवर उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांचे आभार रामदास नागटिळक यांनी मानले.

# फैसल उर्दू हायस्कूल मध्ये दहावीचे विद्यार्थ्यांना निरोप समारंभ




सोलापूर/प्रतिनिधीः फैसल उर्दू हायस्कुल मध्ये दहावीच्या विद्यार्थ्यां करिता निरोप समारंभ आयोजित करण्यात आला होता. समारंभाच्या अध्यक्षस्थानी छत्रपती शिवाजी मुस्लिम ब्रिगेड चे जिल्हा उपाध्यक्ष तथा प्रबोधन न्युज चे कार्यकारी संपादक रिझवान शेख होते. यावेळी संस्थेचे नूतन चेअरमन असिफ इकबाल यांचा मुख्याध्यापक साजिद शाभाई यांच्या हस्ते टाळ्यांच्या गजरात स्वागत करुन शाल व पुष्पगुच्छ देऊन शानदार सत्कार करण्यात आला. यावेळी महाराष्ट्र उर्दू प्राथमिक स्कूल चे मुख्याध्यापक जुबेर हिपर्गी , शाहिद टिपू सुलतान प्राथमिक स्कूल चे मुख्याध्यापक शफी चितापुरे,निदा उर्दू प्राथमिक स्कूल चे मुख्याध्यापक फयाज सगरी, जेष्ठ कवी सिराज सोलापूरी, डॉ.मतीनशेख, सामाजिक कार्यकर्ते उस्मानभाई शेख, आयेशा सर्वरचे मुख्याध्यापिका अंजुम मॅडम ,चांद तारा प्राथमिक उर्दू शाळेचे मुख्याध्यापिका गजाला मॅडम ,दर्शनाळ जिल्हा परिषद प्राथमिक शाळे चे मुख्याध्यापिका दफेदार मॅडम व तसेच धोत्रीचे प्राथमिक शाळे चे मुख्याध्यापक आफक जमादार यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात कुरान पठण करून करण्यात आली . शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षक यांच्या हस्ते मान्यवरांचे स्वागत करुन शाल बुके देऊन सत्कार करण्यात आला. शाळेच्या मुख्याध्यापक साजिद शाभाई यांनी आपल्या प्रस्ताविकातून विद्यार्थ्यांना संघर्ष करून यश संपादन करण्यास सांगितले तसेच दहावी च्या परीक्षेसाठी व भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. संस्थेचे अध्यक्ष आसिफ इक्बाल यांनी दहावी नंतर फक्त विज्ञान शाखेच्या आग्रहांनाधरता आपल्या आवडीच्या क्षेत्रात करिअर करण्या संदर्भात तसेच स्पर्धा परीक्षा संदर्भात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. भविष्यात विद्यार्थ्यांनी यशस्वी होऊन आपल्या शाळेबरोबरच शिक्षकांनाही विसरू नये, असा सल्ला चेअरमन असिफ इकबाल यांनी दिला. आपल्या अध्यक्षीय भाषणात रिजवान शेख यांनी शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रामध्ये मुलींच्या वाढत्या सहभागाबद्दल कौतुक केले व विद्यार्थ्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

विद्यार्थी व विद्यार्थिनी आपल्या मनोगतातून शाळा व शिक्षक यांनी त्यांच्या शालेय जीवनात शिस्त संस्कार व गुणवत्ता वाढीसाठी घेतलेल्या कठोर परिश्रम बद्दल कृतज्ञता व्यक्त केली.दहावीच्या विद्यार्थ्यांनी नातं व भाषण सादर केली. उत्कृष्ट नातं सादर केलेल्या विद्यार्थी अयान शेख ला संस्थेचे चेअरमन असिफ इकबाल यांनी ५०० रुपये बक्षीस देऊन कौतुक केले. यावेळी शाळेचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी बहुसंख्य विद्यार्थी व पालक उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सूत्रसंचालन अमजद बागवान सर यांनी केले तर आभार सरफराज ददापुरे सर यांनी मानले.

## सुरु होतोय अरुंधतीचा नवा प्रवास...

# १८ मार्चपासून दुपारी २.३० वाजता भेटीला येणार लोकप्रिय मालिका आई कुठे काय करते...



स्टार प्रवाहची लोकप्रिय मालिका आई कुठे काय करते अत्यंत महत्त्वाच्या टप्प्यावर येऊन पोहोचली आहे. अरुंधतीने कुटुंबासाठी आपलं सर्वस्व पणाला लावलं. तिच्या वाट्याला मात्र नेहमी संघर्षच आला. अनिरुद्धकडून झालेली फसवणूक, २५ वर्षांच्या संसाराचा दुर्दैवी शेवट, घटस्फोट आणि आशुतोषसोबत लग्न करुन नव्याने संसार थाटण्याचा घेतलेला निर्णय. अरुंधतीच्या आयुष्यात अनेक सुख-दु:खाचे क्षण आले. मात्र अरुंधती परिस्थितीसमोर कधीही हतबल झाली नाही. दु:ख मागे सारून ती प्रत्येक प्रसंगाशी ताठ मानेने लढली. आशुतोषसोबत नव्याने आयुष्य सुरु करुन सुखाचे क्षण अनुभवत असतानाच पुन्हा एकदा नियती अरुंधतीची परिक्षा घेणार आहे. सगळं काही सुरळीत सुरु असतानाच अचानक एका अपघातात आशुतोषचं निधन होणार आहे. अरुंधतीसाठी हा सर्वात मोठा धक्का असणार आहे. या कठीण प्रसंगात अरुंधतीच्या पाठीशी आईच्या मायेने ठामपणे उभी रहाणार आहे अरुंधतीची सासू अर्थात कांचन. सासू कधीच आईची जागा घेऊ शकत नाही असं म्हण्टलं जात. मात्र कांचनने उचललेलं पाऊल समाजातील अनेक अरुंधतींना नक्कीच नवी उभारी देईल. कांचनच्या साथीने अरुंधती या कठीण प्रसंगाचा सामना कसा करणारा याचा प्रवास आई कुठे काय करते मालिकेच्या पुढील भागांमधून उलगडेल. तेव्हा पाहायला विसरु नका आई कुठे काय करते १८ मार्चपासून दुपारी २.३० वाजता फक्त स्टार प्रवाहवर.

**स्टार प्रवाह संपर्क : सोनाली शिगवण मो.९९३०९२३२४८**

# वागदरी येथे संत कक्कय्या महाराज यांची जयंती साजरी



वागदरी/प्रतिनिधीः वीरशैव कक्कय्या ढोर समाजाचे आराध्य दैवत,बसवशरण साहित्याचे रक्षण करणारे संत कक्कय्या महाराज यांची जयंती समाजबांधवांच्या वतीने वागदरी येथे साजरी करण्यात आली.

येथील वागदरी संत कक्कय्या सभागृहांत विरशैव कक्कय्या महाराजांची ९१९ वी जयंती साजरा करण्यात आली यावेळी सौ. सिंधुताई सोनकवडे माजी जि प सदस्या ,सौ रेखा सोनकवडे मुख्याध्यापिका ,सौ. सुनिता सोनकवडे ,सौ.किरण सोनकवडे ,सौ.पुजा मोहरकर ,सौ.ज्योती वागदरीकर, सौ सरूबाई सोनकवडे,सौ सोनाली कटके, भुमिका सोनकवडे, वैश्र्नवी सोनकवडे, श्रावणी ईशा राशी श्री लक्ष्मण सोनकवडे,सुधिर सोनकवडे,गंगाराम सोनकवडे,पंचप्पा सोनकवडे, प्रशांत वागदरीकर, सुरेश सोनकवडे,मल्लीनाथ सोनकवडे, रोहित सोनकवडे, परमेश्र्वर सोनकवडे,भिमाशा सोनकवडे, नरसिंह मोहरकर निलपा नंदे सह समाज बांधव उपस्थित होते. तसेच महिला दिनानिमित्त विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन यावेळी करण्यात आले होते. उपस्थित महिलांचे गुलाब पुष्प देऊन महिला दिनानिमित्त शुभेच्छा देण्यात आल्या.



# निफाड सायकलिस्टस् तर्फे महिला दिनानिमित्त राईडचे आयोजन

निफाड/प्रतिनिधी : निफाड सायकलिस्ट च्या वतीने महिला दिनाचे औचित्य साधून राईड चे आयोजन करण्यात आले होते. २५ सायकलिस्टने राईडमध्ये सहभाग घेतला.असुन निफाड सायकलिस्टच्या संचालिका व नगराध्यक्षा डॉ. कविता धारराव आणि स्व. शांतीलाल सोनी निफाड नागरी पत संस्थेचे अध्यक्ष अशोकराव पोफळीया यांच्या हस्ते. हिरवा झेंडा दाखवून राईडची सुरुवात करण्यात आली.. तुळजाभवानी मंदिर, ऊगाव रोड निफाड शिवडी येथे वकील संघाचे उपाध्यक्ष रामनाथ शिंदे यांनी शुभेच्छा दिल्या असून ऊगाव जिव्हेश्र्वर मंदिर, खेडे येथे हिंग्लाज माता मंदिर, नांदुर्डी येथील वरद विनायक मंदिर येथे पोहोचले. या प्रसंगी वकील संघाचे उपाध्यक्ष ॲड रामनाथ शिंदे, सुरेश बाबा पाटील, माजी .नगराध्यक्ष राजाभाऊ शेलार, सुनील घेगडे व मित्र परिवाराच्या वतीने. सर्वांना शुभेच्छा दिल्या. २४ किमी असा प्रवास सर्व सायकलीस्ट यांनी पुर्ण केला. ज्या सदस्यांना सायकलिंग शक्य नव्हते त्यांनी ५ किमी पायी चालून सहभाग नोंदवला. राईड प्रमुख सीमा डेर्ले, डॉ सविता ताथेड, आरती मोगल यांनी महिला दिननिमित्त राईडचे आयोजन व नियोजन केले.सदर राईड मध्ये प्रिया चोरडिया, राणी व्यवहारे, मनीषा वाघ, अथेलिस्ट शारदा काळे, कु ताथेड, शरयु कडवे, अनु शिंदे, वाघावकर, हाडपे, शिंदे, सांगळे आदी महिलानीं सहभाग नोंदविला. अध्यक्ष प्रवीण तनपुरे, उपाध्यक्ष अशोक कोल्हे, सचिव विनोद बनकर, पांडुरंग कडवे, दिपक घंगाळे,श्याम भंडारे, प्रशांत व्यवहारे यांनी सहभाग नोंदवला.या प्रसंगी गावा गावात पाणी अडवा पाणी जिरवा, अवयव दान श्रेष्ठ दान, सायकल चालवा पर्यावरण वाचवा, जल है तो कल है.. आदी घोषणांची जनजागृती करण्यात आली,

# देडे यांचे कार्य कौतुकस्पद : पोलीस महानिरिक्षक फुलारी



लहुजी शक्ती सेना जिल्हा अध्यक्ष वसंत देडे यांनी बसस्थानक परिसरात पाणपोई प्रारंभ केली आहे याठिकाणी कोल्हापुर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरिक्षक सुनिल फुलारी यांनी भेट दिली याप्रसंगी ग्रामीण पोलीस अधिक्षक शिरिष सरदेशपांडे पोलीस अधिकारी वैभव जाधव विभागीय पोलीस अधिकारी विलास यामवार पोनि

अक्कलकोट/प्रतिनिधीः उन्हाची तीव्रता वाढली आहे .अशा स्थिती मध्ये वसंत देडे सारखा सामान्य कार्यकर्ता स्वखर्चाने बसस्थानक सारख्या गर्दीच्या भागात शुद्ध थंड पाण्याची व्यवस्था करून पाणपोई ची व्यवस्था करतात हे कौतुकस्पद कार्य असल्याचे कोल्हापुर परिक्षेत्र विशेष पोलीस महानिरिक्षक सुनिल फुलारी यांनी मत व्यक्त केले.

राजेद्र टाकणे महेश स्वामी सपोनि चंद्रकांत पुजारी शिवराज स्वामी ड विजय हर्डीकर पशु संवर्धन अधिकारी दिनेश मुरुमकर फरू जमादार बसवराज कोळीः सद्दाम शेख,कृष्णात देडे गणेश देडे : अप्पु कलशेट्टी,रमेश वाले,सोमनाथ माळशेट्टी,मुबारक कोरबु,स्वामीनाथ बेंद्रे, , बिपीन सुरवसे महादेव चिंचोळकर विरभद्र कोल्हाटी शरद चव्हाण अनिल चव्हाण आदि बहुसंख्य नागरिक उपस्थित होते

# दुधनीचे विकासासाठी निधी कमी पडू देणार नाही : आ.सचिन कल्याणशेट्टी

## विविध विकासकामाचे भुमी पुजन व नागरी सत्कार कार्यक्रम संपन्न

दुधानी /प्रतिनिधी : अक्कलकोट तालुक्यातील दुधनी येथे विविध विकास कामाचे भूमिपूजन कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते यावेळी प्रतिमा पूजन व दिपप्रज्वलन आ.सचिन कल्याणशेट्टी व रामचंद्र बिराजदार यांच्या हस्ते करण्यात आले त्यानंतर मान्यवरांचे हस्ते सत्कार समारंभ झाला. कृ.उ.बा.समितीचे सभापती सातलिंगप्पा (अप्पु) परमशेट्टी बोलताना म्हणाले की, आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी हे दुधनी विकास कामासाठी पाच कोटी वीस लाख रुपये निधी दिले आहेत



५० वर्षापासून पाण्यासाठी दुधनी वंचित आहे येणार काळा मध्ये पाणी कमी पडू देणार नाही दुधनी गावामध्ये पाणी साठी एक कोटी पन्नास लाख कामाची ही मंजुरी आ.सचिन कल्याणशेट्टी यांनी केले आहेगेल्या ५० वर्षांपासून दुधनी शहरात नगरपरिषद आहे आणि भारत स्वातंत्र्याचा ७५ वा अमृत महोत्सवही झाला पण दुधनी गावातील पाण्याची समस्या जशाच तसे आहे. यावेळी बोलताना आमदार कल्याणशेट्टी म्हणाले की मी आमदार झाल्यापासून दुधनीचा पाण्याची समस्या कसे मिटवावे हे मला सतावत होते म्हणुन कुरनुर धरणातून पाणी सांगवीला आणुन तिथुन पाणी पाईप लाईनद्वारे दुधनीला पाणी देणार व सध्या कामही चालु आहे पुढच्या उन्हाळा पर्यंत दुधनीतील पाण्याचा प्रश्न मिटुन जाईल असे आ.कल्याणशेट्टी यांनी सांगितले.यावेळी रिपाईचे वतीने रेल्वे स्टेशनं दलित वस्तीसाठी बाबासाहेब आंबेडकर समुदाय भवन ची मागणी मानव सेव अधिकार यांच्या कडून क्रीडागाणं मागणी करण्यात आले. यावेळी रामचंद्र बिराजदार, महेश पाटील, मोतीराम राठोड, अंकुश चौगुले, दयानंद बबमनाली,शंकर भांजी, उपासभापती सिद्धराम भाके,बसवराज हौदे, हणमंत कलशेट्टी, विठ्ठल अमाणे,रिपाई चे सैदप्पा झाळकी,प्रकाश कळसगोंड, शेकर स्वामी,श्रीमंत बिराजदार,जगनाथ जादव,भीमा अंदेनी, दौलत हौद,काशीनाथ यरगल, बाबा टक्कळकी, रेवणसिध्द माशाळ,शिवराज गुळगोंडा,संतू दैनाक,माईंदीमाय जिडगे व प्रतिष्ठित आडत व्यापारी आदी गावातील लोक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ८ मार्च जागतिक महिला दिन: सांगोला शहरातील महिलांसाठी सांगोला नगरपरिषदेने आयोजित केल्या विविध स्पर्धा

पंढरपूर/राजेंद्र कोरके पाटील : महिलांनी स्वतःच्या हक्कासाठी दिलेल्या लढ्याच्या स्मरणार्थ दरवर्षी ८ मार्च हा दिवस जागतिक महिला दिन म्हणून साजरा करण्यात येतो याचाच एक भाग म्हणून सांगोला नगरपरिषदेच्या वतीने शहरातील महिलांसाठी विविध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे यामध्ये पाककला स्पर्धा होम मिनिस्टर यासारखे स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते



दिनांक पाच मार्च रोजी आयोजन करण्यात आले होते यामध्ये शहरातील ४४ स्पर्धकांनी भाग सहभाग नोंदवला या स्पर्धेसाठी परीक्षण म्हणून मुख्याधिकारी ड्रॉ सुधीर गवळी तालुका कृषी अधिकारी श्री शिवाजीराव शिंदे माजी नगराध्यक्ष सौ राणीताई माने श्रीमान शुभांगी पतंगे मॅडम यांनी कामकाज पाहिले स्पर्धेत प्रथम क्रमांक श्रीमान शुभांगी तेली द्वितीय क्रमांक श्रीमान सरिता निगाडे तृतीय क्रमांक श्रीम वैजनाथ धोंडे यांचा तर उत्तेजनाचा म्हणून श्री म अरुणा लोखंडे यांचा क्रमांक आला

दिनांक ६ मार्च रोजी होम मिनिस्टर बक्षीस वितरण इत्यादी कार्यक्रम घेण्याचे आणि यावेळी होम मिनिस्टर या मजेदार खेळाच्या माध्यमातून तीन स्पर्धकांना पैठणी भेट देण्यात आली सदर स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक श्री मा मनीषा कुंडेकरी द्वितीय क्रमांक श्री अरुणा लोखंडे तृतीय क्रमांक श्रीम सविता लोखंडे यांचा आला

लकी ड्रॉच्या माध्यमातून उपस्थितांना वीर बक्षिसांचे वाटप करण्यात आले विजेत्या व उत्तेजनात स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह व बक्षिसाच्या रकमेच्या धनादेश वितरण करण्यात आले यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून लोकनियुक्त माजी नगराध्यक्ष सौ राणीताई माने मुख्याधिकारी ड्रॉ सुधीर गवळी तालुका कृषी अधिकारी श्री शिवाजीराव शिंदे निवडणूक नाही तहसीलदार श्रीमद शुभांगी जाधव कृषी अधिकारी पंचायत समिती दिपाली शेंडे माजी उपनगराध्यक्ष स्वातीताई मगर माजी नगरसेविका सौ छायाताई मिटकरी माजी नगरसेवक सुनीता खडतरे माजी नगरसेविका सौ अनुराधा खडतरे अध्यक्ष कर्तव्य शेअर्स तर सध्या श्रीमद सुनंदा लोखंडे कार्यालयाने अधीक्षक श्री स्वप्निल हाके हे उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पवार मेरे यांनी केले सदरचे कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कर निरीक्षक श्री रोहित गाडे सह प्रकल्प अधिकारी योगेश गंगाधारी प्रतिभा कोरे समुदाय संघटक वीराप्पा हाके शरद थोरात सौ राजश्री खडतरे सौ सारिका लोखंडे सविता लोखंडे व नगरपरिषद कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतली

# नळदुर्ग येथे जागतिक महिला दिनानिमित्त रिपाइं (आठवले) च्या वतीने कष्टकरी महिलांचा सत्कार

वागदरी/ एस.के.गायकवाड : जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून रिपब्लिकन पार्टी आँफ इंडिया (आठवले) च्या वतीने तुळजापूर तालुक्यातील नळदुर्ग येते सामान्य कुटुंबातील कष्टकरी महिलांचा सत्कार करण्यात आला. दि.८ मार्च जागतिक महिला दिनाना मित्ताने नळदुर्ग येते रिपाइं (आठवले) च्या वतीने येथील बसस्थाकातील नवनाथ रसवंतीग्रहात कष्ठकरी महिलांच्या सत्काराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पती बरोबर ऊसाचा रस गाळूण आपला व्यवसाय सांभाळणारी छायाबाई रामदास कांबळे व महाराष्ट्र होमगार्ड पोलिसदलात कार्यरत असलेली महिला होमगार्ड राधाबाई गायकवाड यांचा बंजारा समाजातील महिला सुरेखा रठोड यांच्या हस्ते यथोचित सत्कार करण्यात आला.



या प्रसंगी रिपाइंचे जिल्हा उपाध्यक्ष बाबासाहेब बनसोडे,जिल्हा सचिव एस.के.गायकवाड,युवा आघाडी जिल्हा कार्याध्यक्ष अरूण लोखंडे,रिपाइंचे तालुका संघटक सुरेश लोंढे,अनिल वाघमारे,शिव सेना (शिंदे गट)जिल्हा उपप्रमुख ज्ञानेश्र्वर घोडके,माजी नगर सेवक किशोर नळदुर्गकर,माजी सैनिक मधुकर लोखंडे,वहातुक नियंत्रक महेश डुकरे,होम गार्ड सचिन चव्हाण,शिवलाल राठोड,जेष्ठ कार्यकर्ते राम झेंडारे सह कार्यकर्ते उपस्थीत होते.

# चेतन सिंह केदार सावंत यांच्या प्रयत्नाने सांगोल्यासाठी दहा ट्रांसफार्मर मंजूर

पंढरपूर/राजेंद्र कोरके पाटील : शेती पंपाला पुरेशा दाबाने वीजपुरवठा व्हावा म्हणून जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्याकडे वारंवार केलेल्या पाठपुराव्यामुळे सांगोला तालुक्यासाठी दहा ट्रान्सफॉर्मर मंजूर झाले असल्याची माहिती भाजपचे जिल्हाध्यक्ष केदार सावंत यांनी दिली. शेतीला अखंडित वीज पुरवठा करण्यासाठी भाजपने जिल्हाध्यक्ष चेतन सिंह केदार सावंत यांनी जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्याकडे वारंवार



पाठपुरावा करून नवीन ट्रांसफार्मर बसवण्याची मागणी केली होती या मागणीला यश आले असून जिल्हा नियोजन समितीच्या वविल बैठकीत सांगोल्यातील दहा ट्रान्सफॉर्मर मंजूर करण्यात आले आहेत सांगोला तालुक्यातील सप्ताह मळा वासोद महादेव टेंडवे वस्ती कडलास पुंडलिक शिंदे वस्ती अकोला गट नंबर १४५ खिलारवाडी केदारवाडी वासु दिलीप कांबळे वस्ती आलेगाव राजेश कांबळे वस्ती मेथवडे वेळापूर राजे संभाजी व शिंदे वस्ती निजामपूर ढगे डीपी सांगोला रोड वासुदेव दहा अतिरिक्त ट्रान्सफॉर्मर बसवण्यात येणार आहेत अशी माहिती भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतन सिंह केदार सावंत यांनी दिली

# स्वेरीमध्ये 'जागतिक महिला दिन' साजरा

पंढरपूर/प्रतिनिधी : 'यत्र तु नार्यः पूज्यन्ते, तत्र देवताः रमन्ते' अर्थात 'जिथे स्त्रीचा सन्मान केला जातो तिथे देवता वास करते.'असे म्हटले जाते. सध्या खूपदा स्त्रियांचे रूप हे कळसुत्री बाहुलीप्रमाणे आहे असे जाणवते पण परिवर्तन हा देखील निसर्गाचा नियम आहे. त्यामुळे थोर महापुरुष जन्माला येतात आणि संपूर्ण चित्र बदलवतात. महापुरुषांच्या विचाराने प्रेरीत होवून समाजात स्त्रियांबद्दल संवेदना आणि सुधारणेचे वारे वाहू लागते. आज जो स्त्रियांना मानसन्मान मिळतो त्याचे खरे श्रेय आपल्या समाजातील महापुरुषांना जाते. सावित्रीबाई फुले यांनी महिलांच्या शिक्षणाचा पाया रचला. स्त्रियांना पुढे योग्य मानसन्मान मिळवून दिला. त्यामुळे स्त्रियांना स्वातंत्र्य देण्याचे, शिक्षित करण्याचे कार्य खऱ्या अर्थाने त्यांनी केले. त्यांना बळ देण्याचे कार्य महात्मा ज्योतिराव फुले यांनी केले. प्रत्येक स्त्रीला समाजामध्ये सन्मानाने वागवणे हे पुरुषांच्या मनात असणे महत्त्वाचे आहे. स्त्रियांच्या प्रगतीमध्ये पुरुषांचा सहभाग असणे आवश्यक आहे. यासाठी स्त्रियांचा सन्मान केवळ एक दिवसापुरता मर्यादित न राहता अखंड राहावा.' असे प्रतिपादन कुचन प्रशालेच्या सेवानिवृत्त प्राचार्या व जेष्ठ रंगकर्मी डॉ. मीरा शेंडगे यांनी केले.



गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयुटमध्ये संस्थेचे सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली 'जागतिक महिला दिन' साजरा करण्यात आला. याप्रसंगी प्रमुख पाहूण्या म्हणून कुचन प्रशालेच्या सेवानिवृत्त प्राचार्या व जेष्ठ रंगकर्मी डॉ. मीरा शेंडगे हया मार्गदर्शन करत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शैक्षणिक अधिष्ठाता व सिव्हील इंजिनिअरिंगचे विभागप्रमुख डॉ.प्रशांत पवार हे होते. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा पूजनाने कार्यक्रमाला सुरवात झाली. महाराष्ट्र गीत व स्वेरी गीतानंतर विद्यार्थ्यांना प्रा. डॉ. शेंडगे यांनी संदेश फलकाद्वारे 'स्त्रीचा सन्मान हाच आपला सुसंस्कार' हा संदेश दिला. पुढे सेवानिवृत्त प्राचार्या डॉ. शेंडगे म्हणाल्या की, 'खरंतर स्त्रियांना सहानुभूतीची गरज नसते पण वर्तमान पत्रे वाचल्यास, सामाजिक संस्थांचे अहवाल पाहिल्यास समाजातील अनेक स्त्रिया हया अन्याय अत्याचाराला बळी पडत असल्याचे दिसून येते. यासाठी स्त्री व पुरुषातील मानसिक अंतर कमी होणे गरजेचे आहे.

जर देशाच्या प्रगतीचा दर्जा सुधारायचा असेल अथवा वाढवायचा असेल तर देशातील स्त्रियांना समानतेची वागणूक मिळाली पाहिजे. यासाठी स्त्रियांसाठी असलेली आर्थिक गुंतवणूक वाढवली पाहिजे. स्त्री ही अधिकारी असली तरी घरी आल्यावर ती एक संसारिक स्त्री होते यामुळे तिच्यावरील जबाबदारी वाढते. तेंव्हा तिला माणूस म्हणून जगताना अनंत अडचणी येतात. यातूनही ती उत्तमपणे जबाबदारी पार पाडते. यासाठी स्त्रीकडे पाहताना सरस्वती, कालीमाता, लक्ष्मी, आदिशक्ती या रूपामध्ये पाहणे गरजेचे आहे त्यामुळे स्त्रियांचा निर्णय घेताना आत्मविश्र्वास वाढेल. तसेच स्त्रियांनी देखील स्वतःला कमी लेखू नये.' असे सांगून महात्मा फुले, महर्षी धोंडो केशव कर्वे, राजा राममोहन रॉय यांनी स्त्रियांच्या स्वातंत्र्याबाबत दिलेल्या योगदानावर त्यांनी प्रकाश टाकला. अध्यक्षस्थानावरून बोलताना डॉ.प्रशांत पवार म्हणाले की 'स्त्री समानता, स्त्री स्वातंत्रता हे बोलण्याऐवजी प्रथम कृतीद्वारे सिद्ध करणे आवश्यक आहे. मी कॉलेजकडे येताना पाहतो की ग्रामीण महिलांचे हाल होत असतात. त्यांच्यात भेदभाव होत असल्याचे जाणवते. यातून जर पुरुषांनी आपली मानसिकता बदलली तरच खऱ्या अर्थाने स्त्रीची प्रगती शक्य आहे. तसेच स्त्रियांनी देखील 'रोटी, कपडा और मकान' यांच्या चाकोरी बाहेर पडणे गरजेचे आहे.' यावेळी डिप्लोमा इंजिनिअरिंगच्या परीक्षेत राज्यात प्रथम, विविध विषयात प्रथम, पैकीच्या पैकी गुण, क्रीडा व सांस्कृतिक विभागात विजेते, उपविजेते अशा तब्बल ३०१ गुणवंत विद्यार्थ्यांना रोख रक्कम व प्रशस्तीपत्र देऊन गौरवण्यात आले. एकूण सात लाख चव्वेचाळीस हजार सातशे पन्नास रुपयांची बक्षिसे डिप्लोमा इंजिनिअरिंगच्या या गुणवंत विद्यार्थ्यांना वितरीत करण्यात आली.

यावेळी कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम.पवार, बी. फार्मसीचे प्राचार्य डॉ. एम.जी. मणियार, डिप्लोमा इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. एन.डी. मिसाळ, डी.फार्मसीचे प्राचार्य प्रा. एस.व्ही.मांडवे, इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगच्या विभागप्रमुख डॉ. दीप्ती तंबोळी, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलेकम्युनिकेशन इंजिनिअरिंगच्या विभागप्रमुख डॉ. मीनाक्षी पवार, इतर अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, यांच्यासह अभियांत्रिकी व फार्मसीचे पदवी व पदविका महाविद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते. अजिंक्य पारडे, ओम कलुबर्मे व सांस्कृतिक कार्यक्रमाचे विभागप्रमुख डॉ. यशपाल खेडकर यांनी सूत्रसंचालन केले तर विद्यार्थिनी सचिवा राजनंदिनी पाटील यांनी आभार मानले.